नियमीत फौ. ख. क्र. ३२/२०१९
सरकार -वि.- राजेंद्र व इतर
नि.क्र. ७८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - उज्वला सुरेश शिंदे,
वय ५५ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
राहणार – नागपूर, ता. जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखते ते आज कोर्टात हजर आहेत. घटना दि.०४.११.२०१८ रोजी दुपारी १.०० ते १.३० वाजताच्या सुमारास सालेभट्टी येथील माझ्या शेतामध्ये घडली होती. त्यादिवशी मी व माझे पती सुरेश शिंदे चना पेरणेकरिता आमच्या शेतामध्ये आलो होतो. त्यावेळी अर्धे शेत पेरुन झाले असता नैना शिंदे व राजेंद्र शिंदे तेथे आले. त्यांनी आल्या बरोबर शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आम्ही त्यांना विचारले की, शिवीगाळ का करत आहात. त्यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही आमच्या वडीलोपार्जित शेतीचा फेरफार रोखला त्यामुळे आम्ही तुम्हाला मारहाण करण्यास आलो आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या पतीला लोखंडी रॉडने मारहाण केली. मी त्यांच्या जवळ का मारतो आहे असे विचारण्याकरिता गेली असता पवन जगताप तेथे आला त्याने मला दोन तीन बुक्या मारल्या व माझे ब्लाऊज फाडले तसेच माझी काळी गळसोळी तोडली. त्यावेळी पवन जगताप तुम्ही फेरफार मागे घ्या असे बोलत होता. आम्ही त्याला सांगितले की, आम्ही फेरफार मागे घेणार नाही असे बोलून आम्ही फिर्याद देण्यास गेलो त्यावेळी आरोपी पोलीस स्टेशनला बसून होते. आता मला माझी लेखी फिर्याद दाखविण्यात आली ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७९** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.८०** देण्यात येते. ज्या लोखंडी रॉडने माझ्या पतीला मारहाण झाली तो मला दाखविल्यास मी ओळखू शकते. पोलिसांनी माझे पुरवनी बयान घेतले होते. आता मला

दाखविलेले जप्त काठी ती नाही. माझ्या पतीला लोखंडी पोकळ रॉडने मारहाण केली होती.

सर तपास संपला.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री भोंबे यांचे मार्फत</u>**

१. मी पोलिसांना लेखी फिर्याद देताना ''त्यादिवशी मी व माझे पती सुरेश शिंदे चना पेरणेकरिता आमच्या शेतामध्ये आलो होतो. त्यावेळी अर्धे शेत पेरुन झाले असता नैना शिंदे व राजेंद्र शिंदे तेथे आले. त्यांनी आल्या बरोबर शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आम्ही त्यांना विचारले की, शिवीगाळ का करत आहात. त्यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही आमच्या वडीलोपार्जित शेतीचा फेरफार रोखला त्यामुळे आम्ही तुम्हाला मारहाण करण्यास आलो आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या पतीला लोखंडी रॉडने मारहाण केली. मी त्यांच्या जवळ का मारतो आहे असे विचारण्याकरिता गेली असता पवन जगताप तेथे आला त्याने मला दोन तीन बुक्या मारल्या व माझे ब्लाऊज फाडले तसेच माझी काळी गळसोळी तोडली. त्यावेळी पवन जगताप तुम्ही फेरफार मागे घ्या असे बोलत होता. आम्ही त्याला सांगितले की, आम्ही फेरफार मागे घेणार नाही असे बोलून आम्ही फिर्याद देण्यास गेलो'' तसे माझ्या फिर्यादीत आहे. साक्षीदाराने पुन्हा फिर्याद वाचून पाहिली असता त्यामध्ये ते नमूद नसल्याचे सांगितले. साक्षीदार सांगते माझे व माझ्या पतीचे मारहाणीमुळे चश्मे शेतात पडल्यामुळे आम्ही ती लेखी फिर्याद वाचू शकलो नव्हतो. पोलिसांनी मला फिर्याद वाचून दाखविली होती. त्यावेळी मी पुराव्यात सांगितलेल्या बाबी फिर्यादीत न आल्याबाबत पोलिसांना विचारणा केली होती. त्यावेळी पोलीस मला म्हणाले की, बरोबर लिहीलेले आहे. मी पोलिसांनी माझ्या सांगितल्याप्रमाणे फिर्याद नोंदविली नाही म्हणून त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केली नव्हती व पवन जगताप याने माझे ब्लाऊज फाडले नव्हते म्हणून मी या बाबी पोलिसांना सांगितले नाही.

२. शेतातील पाईप काढून घेण्याकरिता माझ्या पतींनी विजय वांढरे यांना सांगितले होते. माझ्या फिर्यादीमध्ये विजय वांढरे यांना मी पाईप काढून घेण्यास सांगितले असे लिहीलेले बरोबर आहे. असे घडले होते की, तथाकथीत घटना घडतेवेळी गावातील लोक आले होते. साक्षीदार सांगते माझ्या पतींनी भांडन वाढू नये म्हणून गावातील काही

लोकांना बोलाविले होते. आता मला माझ्या पुरवनी बयानातील अधोरेखीत भाग 'अ' वाचून दाखविण्यात आला तो मी फिर्याद देताना सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुरवनी बयानातील अधोरेखीत भाग 'अ' माझ्या फिर्यादीत नाही. साक्षीदार सांगते फिर्याद देतेवेळी आमचे चश्मे नसल्यामुळे मी लेखी फिर्याद वाचू शकले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडली नसल्यामुळे तसे माझ्या फिर्यादीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दुसऱ्या दिवशी पोलिसांनी व्यवस्थीत फिर्याद न घेतल्यामुळे त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हेतू पुरस्सर व आरोपींना फसविण्याकरिता खोटे पुरवणी बयान दिले. हे म्हणणे खरे नाही की, नैना शिंदे हिच्यासोबत झालेल्या लांबाझोंबीमध्ये माझी गळसोळी तुटली व ब्लॉऊज फाटले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे कुठलेही ब्लॉऊज फाटले नसल्यामुळे त्या संदर्भात माझ्या लेखी फिर्यादीत नमूद केलेले नाही. मी फिर्याद देण्यास ४.३० ते ४.४५ वा. दरम्यान गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना घडल्यानंतर मी शेतामध्ये पेरणी करीत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी तथाकथीत घटनेबाबत पेरणी करीत असताना पोलिसांना सांगितले नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने राजेंद्र शिंदे याला लाकडी उभारीने मारहाण केली होती. साक्षीदार सांगते लाकडी उभारी उगारली होती. साक्षीदार पुन्हा सांगते लाकडी उभारी उगारली होती हे माझ्याकडून चुकीने सांगितले गेले. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र शिंदे व नैना शिंदे प्रथम रिपोर्ट देण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, राजेंद्र शिंदे व नैना शिंदे आमच्या पहिले रिपोर्ट देण्यास गेल्याचे माहीत झाल्यामुळे मी ही फिर्याद देण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, नैना शिंदे यांच्या फिर्यादीवरुन माझ्यावर कारवाई होईल या भितीने मी त्यांच्या विरुद्ध खोटी फिर्याद दिली. फाटलेले ब्लाऊज पोलिसांना दिले नव्हते. पोलिसांनी ते मागितले नसल्यामुळे मी दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पवन जगताप याने माझे कधीही ब्लाऊज फाडले नसल्यामुळे मी ते पोलिसांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपींमध्ये पटत नाही. घटनेच्या आधी माझी व माझ्या पतीची आरोपीसोबत बोलचाल सुरु होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासऱ्यांनी मृत्यू पत्र करुन दिल्यापासून माझे पती व आरोपींमध्ये वाद विवाद सुरु झाले

आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादामुळे मी आरोपी विरुद्ध खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १६.१२.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.